जीवनदायी आरोग्य योजना रुग्णालयांनी केलेल्या
शस्त्रक्रिया व उपचारांचा खर्च मंजुर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः जीआयो-२०१६/प्र.क्र.२५९/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई, जी.टी. रुग्णालय आवार, १० वा मजला
तारीख: १४ मार्च, २०१८

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.जीआयो-२०१६/प्र.क्र.२५९/आरोग्य-६, दिनांक २०.०१.२०१७
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७
३) सहसंचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे क्र. संआसे/ कक्ष-३ /टे-११/२२१०१३११/पुरवणी मागणी/सन २०१७-१८/१७, दिनांक ०२.११.२०१७

शासन निर्णय :-

जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णालयांना सहसंचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा संचालनालय यांनी संदर्भाधिन क्र.३ येथील पत्रान्वये कळविल्यानुसार, सन २०११-१२ ते सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात केलेल्या उपचार व शस्त्रक्रियांवरील रुग्णालयांचा खर्च विचारात घेऊन खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे रु.५,४१,७७,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी एकेचाळीस लक्ष सत्याहत्तर हजार फक्त) एवढी रक्कम वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(आकडे रूपयात)

अ.क्र.	रूग्णालयाचे नाव	रक्कम
१	बालाजी रुग्णालय, मुंबई	रू.२,३७,५५,०००/-
२	साईबाबा रुग्णालय, शिर्डी जि. अहमदनगर	रू. ३,०४,,२१,३४९/-
	एकुण	एकूण रू.५,४१,७६,३४९/- (एकूण रू.५,४१,७७,०००/-)

२. सदर रक्कम सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून खाली दर्शविलेल्या लेखाशिर्षामधुन खर्ची टाकण्यात यावी.

मागणी क्र. आर-१, २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, (०६) पंचवार्षिक योजनेंतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०६) (२४) जीवनदायी आरोग्य योजना-आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत, (२२१० १३११), १३ - कार्यालयीन खर्च

३. सदर मंजुर रक्कमेमधून रुग्णनिहाय अदा केलेल्या खर्चाची माहिती विहीत नमून्यामध्ये १५ दिवसांत शासनास सादर करण्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा,आरोग्य सेवा संचालनालय यांची राहील. सदर रक्कम रुग्णालयांना अदा करतांना देयके पुर्णपणे तपासून खात्री केल्यानंतरच अदा करण्यात यावीत.

४. वित्त विभागाच्या दि.१८.०४.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांचे सर्व संबंधितानी काटेकोरपणे पालन करावे. तसेच प्रमाणित करण्यात येते की, सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ मध्ये नमुद अटींची पुर्तता झाली आहे.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभाागाच्या अनौ.संदर्भ क्र.८१/१८/व्यय-१३, दिनांक २०.०२.२०१८ व अनौ.संदर्भ क्र.२९१/१८/अर्थ-९, दिनांक २२.०२.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१३१३०२२५४८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Nivruti Gadge

Digitally signed by Subhash Nivruti Gadge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b1f74930407346db2703eca69fb25a73a3ba8647d94e4c83579e877eeaa6372e, serialNumber=8aa1f531272224e355732cc20c64b2a014c4d982a276b8f3e7048995acbf1651, cn=Subhash Nivruti Gadge
Date: 2018.03.15 15:29:22 +05'30'

(सु.नि.गाडगे)

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
६. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे.
७. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई. (३प्रती)
८. नियोजन विभाग, कार्यासन १४७२, मंत्रालय, मुंबई -३२.
९. वित्त विभाग, कार्यासन - व्यय -१३/अर्थसंकल्प-९, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. अर्थसंकल्प शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती